दैनिक पुण्यनगरी दि. 24/12/2025

# चोराकडून २२ सायकल जप्त

## भाग्यनगर पोलिसांची कामगिरी

**नांदेड / प्रतिनिधी**



शहराच्या विविध भागात सायकल चोरीच्या घटना ही वाढल्या असल्याने भाग्यनगर पोलिसांनी पाळत ठेवून एका चोरट्याला पकडले. त्याच्याकडून चोरलेल्या २२ सायकली जप्त करण्यात आल्या आहेत. या सायकल अंदाजे २.३७ लाख रुपयांच्या असल्याचे सांगण्यात आले.

दि. २२ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.१६ वाजता रवींद्र अनंतराव मोरे ४५ संकेतनगर नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सायकल चोरीचा गुन्हा भाग्यनगर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला होता. त्याचा गुरनं ६६०/२५ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता असा आहे.या गुन्ह्याबाबत भाग्यनगर पोलिस ठाण्याचे गुन्हे शोध पथक चोराच्या शोधात निघाले. तेव्हा त्यांना गोपनीय माहितीद्वारे एका सायकल चोराबाबत माहिती मिळाली. या माहितीची खातरजमा करीत एका संशयित सायकल चोराचे घर पोलिसांनी गाठले आणि कल्याणनगर येथील माधव गणतप मोरे ४५ याच्या घराची झडती घेतली असता तेथे एकूण २२ सायकल चोरलेल्या ठेवल्याचे आढळून आले. या सायकल चोरट्याने विविध शिकवणी वर्गाच्या बाहेरुन व वस्त्यांमधून चोरल्याची कबुली दिली. त्याला सायकलीसह ताब्यात घेण्यात आले. अटक करुन पुढील तपास पोहेकाँ एन.टी.चापके करीत आहेत. ही कारवाई पोलिस निरीक्षक संतोष तांबे,महेश माळी (गुन्हे), गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख,नरेश वाडेवाले, विशाल माळवे,गजानन किडे,विष्णुकांत मुंडे, राजीव घुले, राहुल लाठकर, नागनाथ चापके,देवीसिंग सिंगल, अंकुश कांबळे यांनी केली.